# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : **diplomadesk10dte@gmail.com** Internet : www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका/सुनावणी/2016-17/ २७५

दिनांक : -2 MAR 2016

**विषय :- शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. बाबत संचालनालयास सादर केलेल्या प्रस्तावांच्या सुनावणीबाबत.....**

**संदर्भ :-** 1. **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल/01(02)/2016.**

2. या संचालनालयाचे पत्र क्र. 10/एनजीपी/एआयसीटीई/2016-17/प्र.वाढ/79, दि. 22.1.2016.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2015-17 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ऍप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2016-17 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या अभ्यासक्रमांना एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून ऍक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. करीता प्रस्ताव संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने पदविका व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमांच्या ज्या अभ्यासक्रमांना एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) कडून ऍक्रिडीटेशन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे अशा पदविका अभ्यासक्रमाच्या सुरु असलेल्या संस्थांनी संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या अभ्यासक्रमात प्रवेशक्षमता वाढ इ. बाबत संस्थांनी परिषदेकडे सादर केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय/ शिफारस परिषदेस सादर करण्याकरीता, संबंधीत संस्थांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक 2 वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त विषयाबाबत या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक 2 पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या **पदविका अभ्यासक्रमाच्या** संस्थांनी प्रवेश क्षमता वाढ, नवीन अभ्यासक्रम इ. बाबतचे प्रस्ताव या संचालनालयास व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना दिनांक 3.3.2016 पर्यंत किंवा विलंबशुल्कासह दिनांक 5.3.2016 ऑनलाईन सादर (Confirm) करतील **त्यापैकी शासकीय संस्था वगळून, उर्वरित संस्थांची सुनावणी या संचालनालयाच्या समिती सभागृहात खालील प्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | विभाग | सुनावणीचा दिनांक | सुनावणी वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1. | 1. औरंगाबाद<br>2. नाशिक<br>3. पुणे | 5.3.2016 | सकाळी 10.30 | समिती सभागृह, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई. |
| 2. | 1. नागपूर<br>2. अमरावती,<br>3. मुंबई | 5.3.2016 | दुपारी 2.30 | |

तरी संबंधीत संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसह सुनावणीकरिता संस्थेचे सचिव/अध्यक्ष/प्राचार्य यापैकी एक यांनी माहितगार व्यक्तीसह व्यक्तीशः या संचालनालयात उपस्थित रहावे ही बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त विषयाबाबत ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निर्दशनास आणून देण्यात यावी.

1. संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयात नोंदणी शुल्क रक्कम भरल्याची पावती.
2. **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस प्रस्ताव सादर केल्याची पोच.**
3. संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या / सुरु असलेल्या पदविका/ पदवी अभ्यासक्रमांना एनबीए (National Board of Accreditation, New Delhi) यांचेकडून प्राप्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशांनुसार वैध ॲक्रिडीटेशन प्रमाणपत्र.
4. किंवा **मा. उच्च न्यायालयाचे आदेश व याचिकेची संपुर्ण प्रत.**
5. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई / तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे प्राचार्य/शिक्षकीय पदांना मान्यतेबाबतचे पत्र/ संबंधीत कागदपत्र.
6. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या कॅंपस प्लेसमेंट बाबतची माहिती.
7. मागील 3 वर्षाच्या प्रवेशाच्या रिक्त जागांबाबत तक्ता.
8. संस्थेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या परिषदा आणि आयोजित कार्यशाळा यांची माहिती.
9. परिक्षेस बसलेले विद्यार्थी व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती.
10. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा त्रुटी अहवाल (Deficiency Report)/ त्रुटी पुर्तता अहवाल(Compliance Report).
11. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या अर्जाची प्रत व कागदपत्र.(अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत)
    अ. भाग-1 (Part I).
    ब. भाग-2 (Part II).
12. संस्थेच्या प्राचार्यानी साक्षांकित केलेले **प्रपत्र क** व **प्रपत्र ड** (Annexure C & D).
13. नोंदणीकृत आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेले **प्रपत्र इ** (Annexure E).
14. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचा मागील शैक्षणिक वर्षाचा सम सत्रातील ॲकेडमीक मॉनेटरींग रिपोर्ट.
15. प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/ प्रवेशक्षमता वाढ याअनुषंगाने संस्थेकडे असलेल्या आर्थिक तरतुदीबाबत कागदपत्र (बँकचे विवरणपत्र, मुदतठेवी, बचत खाते इ.)
16. कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत बँकेचे विवरणपत्र.
17. तसेच प्रस्तावात नमूद माहितीच्या अनुषंगाने संबंधीत इतर कागदपत्रे.

तसेच पुढे असेही नमूद करण्यात येते की, ऑनलाईन प्रस्ताव सादर (Confirm) केलेल्या संस्था सदर सुनावणीस अनुपस्थित राहील्यास याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील, याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या सर्व व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
2. कार्यासन क्रमांक 3 (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी तसेच त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सुनावणीसाठी समिती सभागृहात 1 संगणक, 1 प्रिंटर इंटरनेट कनेक्शन सुविधेसह उपलब्ध करुन देण्यात यावा.
3. कार्यासन क्रमांक 12 (आस्थापना), मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, दिनांक 5.3.2016 रोजी संचालनालयाचे समिती सभागृह पदविका अभ्यासक्रमांच्या सुनावणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.
4. निवडनस्ती